# अण्णा भाऊ साठे यांनी समाजप्रबोधनाचे बहुमोल कार्य केले: डॉ. आनंद पाटील

वाई, दि. ३, अण्णा भाऊ साठे हे अगोदर लोककलाकार होते व नंतर लेखक होते. त्यांनी शाहिरीच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि मार्क्सवाद बहुजनांपर्यंत पोहचविला त्यांचे हे कार्य मोलाचे आहे, असे प्रतिपादन गोवा विद्यापीठातील माजी इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. आनंद पाटील यांनी केले. जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालय, वाई येथे मराठी विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ''अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान'' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. प्रतापराव भोसले (भाऊ), प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता पाटील संस्थेचे संचालक केशवराव पाडळे, सचिव डॉ. जयवंतराव चौधरी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रशेखर येवले, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे सचिव, डॉ. प्रकाश दुकळे, मराठी विभागप्रमुख व चर्चासत्राचे संयोजक डॉ. चंद्रकांत कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या विवेचनात डॉ. पाटील पुढे म्हणाले,अण्णा भाऊंची सामाजिक बांधिलकी साम्यवादी मानवतेशी होती. त्यांचा लढा दबलेल्या सर्व जाती–धर्मातील बहुजन गरीबांसाठी होता. त्यांच्या साहित्यात अन्यायाबद्धल चीड आहे. उपेक्षित, भटक्या, दलित माणसाला त्यांनी आपल्या साहित्यात नायक केले. त्यांच्या साहित्याचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने होणे गरजेचे आहे. अण्णा भाऊंची सामाजिक बांधिलकी साम्यवादी मानवतेशी आहे. अण्णा भाऊंचा पुतळा मॉस्कोत जायला चिरानगरच्या झोपडपट्टीतील त्यांचे गिरणी कामगारांच्या विद्यापीठातील शिक्षण व अनुभव उपयोगी पडले. तेथील दु:ख, दैन्य, दारिद्र्य, मरणप्राय यातना, आक्रोश या सर्वांच्या साक्षीने ते लिहीत होते. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक परिवर्तनासाठी त्यांची लेखणी शेवटपर्यंत तेवत राहिली. खऱ्या अर्थाने अण्णा भाऊ हे 'साहित्यसम्राट' होते.

कार्यक्रमांची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलाने झाली. श्री अमित नवनाथ शिंदे या विद्यार्थ्याने अण्णा भाऊ साठे यांची 'माझी मैना गावावर राहिली' ही लावणी सादर केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रतापराव भोसले (भाऊ), यांनी अण्णा भाऊ साठे लोकलेखक आहेत, त्यांनी वास्तवजीवनाचे चित्रण केले. मराठी साहित्यात त्यांचे स्थान अढळ असल्याचे त्यांनी सांगितले प्राचार्य डॉ. येवले यांनी उच्चभ्रू साहित्यिक आणि अण्णा भाऊ यांची तुलना करुन, अण्णा भाऊ हे ग्रामीण व दलित

जीवन डोळयांसमोर उभे करणारे महान लेखक होते, असे सांगितले डॉ. दत्ता पाटील यांनी अण्णा भाऊ साठे यांच्या चरित्राबरोबरच त्यांच्या साहित्याचीही माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. चंद्रकांत कांबळे यांनी केले, पाहुण्यांची ओळख डॉ. धनंजय निंबाळकर यांनी करुन दिली. आभार डॉ. संग्राम थोरात यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब कोकरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागातील प्रा. चंद्रशेखर भारती व प्रा. रेश्मा पाटील यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाला विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी महाविद्यालयातील कला, वाणिज्य व विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. भानुदास आगेडकर, प्रा. विलास करडे, डॉ. इब्राहीम पैलवान महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

O.K.

3/11/2020

Shri. Prataprao Bhosale - President & Trustee
Janata Shikshan Sanstha, Wai
Shri. Shankarrao Gadhave - Vice President & Trustee
Janata Shikshan Sanstha, Wai

Janata Shikshan Sanstha's
**KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI, (Dist. Satara) Maharashtra Pin: 412803**
Affiliated to Shivaji University, Kolhapur, S. U. Affl. T-2-28741
NAAC Accredited Status: B+ with CGPA 2.66
जनता शिक्षण संस्थेचे,
**किसन वीर महाविद्यालय, वाई, (जि. सातारा) महाराष्ट्र पिन : ४१२८०३**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर शि. वि. सं. टी –२–२८७४१ संलग्नीत
नॅक अधिस्विकृती : 'बी+' सीजीपीए २.६६
Website : http://www.kvmwai.org E-mail: prin.kvmwai@rediffmail.com oskvmwai@rediffmail.com

Principal
Dr. C. G. Yeole
M.Sc. Ph.D.,
Ph. (Off./Fax) 02167-220130
Principal : 02167-221972

प्राचार्य
डॉ. सी. जी. येवले
एम्.एस्सी. पीएच्.डी.
दूरध्वनी : (कार्या./फॅक्स) ०२१६७–२२०१३०
प्राचार्य – ०२१६७–२२१९७२



Kisan Mahadeo Veer
Founder President
Janata Shikshan Sanstha, Wai

Ref. :
संदर्भ :

Date :
दिनांक :

प्रति,
**मा. डॉ. आनंद पाटील**
माजी इंग्रजी विभाग प्रमुख
गोवा विद्यापीठ,
गोवा

विषय :— आभार पत्र...

महोदय,

सोमवार दि. ३० डिसेंबर २०१९ रोजी **"अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान"** या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रास आपण **बीजभाषक** म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले, त्याबददल महाविद्यालय आपले आभारी आहे.

कळावे,

J. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist. Satara

आपला विश्वासू,

[signature]

प्राचार्य

जनता शिक्षण संस्थेचे,

# किसन वीर महाविद्यालय, वाई (सातारा)
## मराठी विभाग

आणि

## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

यांच्या संयुक्त विद्यमाने

# एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र
# अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान

सोमवार, दि. ३० डिसेंबर २०१९

सकाळी : ११.०० वा.

## * उद्घाटन समारंभ कार्यक्रम पत्रिका *

दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन

स्वागत समारंभ

- अण्णा भाऊ साठे यांची छक्कड :- श्री. अमित शिंदे व इतर
- प्रास्ताविक :- डॉ. चंद्रकांत कांबळे
- मा. अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व बीजभाषक यांचा परिचय :- डॉ. धनंजय निंबाळकर
- बीजभाषण :- डॉ. आनंद पाटील
  मराठी इंग्रजी विभाग प्रमुख, गोवा विद्यापीठ, गोवा
- प्रमुख पाहुणे यांचे मनोगत :- डॉ. दत्ता पाटील
  अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
  डॉ. प्रकाश दुकळे
  सचिव, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
- मा. प्राचार्यांचे मनोगत :- प्रा. डॉ. चंद्रशेखर शेळके
  प्राचार्य, किसन वीर महाविद्यालय, वाई
- अध्यक्षीय भाषण :- मा. प्रतापराव भोसले (भाऊ)
  अध्यक्ष, जनता शिक्षण संस्था, वाई
- आभार :- डॉ. संग्राम थोरात
- सूत्रसंचालन :- प्रा. बाळासाहेब कोकरे

प्रा. डॉ. चंद्रकांत शं. कांबळे
मराठी विभाग प्रमुख
किसन वीर महाविद्यालय, वाई
दि. २७/१२/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य,
किसन वीर महाविद्यालय, वाई

विषय :- पाहुण्यांच्या मानधनाबाबत...

महोदय,
सोमवार दि. ३० डिसेंबर २०१९ रोजी संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी जे मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत, त्यांच्या मानधनाला परवानगी असावी, ही नम्र विनंती.

मानधनाचा तपशील खालील प्रमाणे

१) डॉ. आनंद पाटील (बीजभाषक) - 10,000=00
2) डॉ. दत्ता पाटील (उद्घाटनाचे पाहुणे) - 05,000=00
3) डॉ. विश्वनाथ शिंदे (वक्ते) - 05,000=00
4) डॉ. मनोहर जाधव (अध्यक्ष) - 05,000=00
5) डॉ. शरद गायकवाड (वक्ते) - 05,000=00
6) डॉ. गिरीश मोरे (वक्ते) - 05,000=00

7) डॉ. संपत गायकवाड (अध्यक्ष) ₹ 05,00

8) डॉ. सुभाष वाघमारे (अध्यक्ष) ₹ 05,0

9) प्राचार्य, डॉ. विलास काळे (पाहुणे) ₹ 05,0

(एकूण = 50,0

कळावे,

Allowed

(आपला विश्वा

प्रा. डॉ. चंद्रकांत शं. कांबळे
मराठी विभागप्रमुख
किसन वीर महाविद्यालय, वाई
दि. 3/12/2019

प्रति,
मा. प्राचार्य,
किसन वीर महाविद्यालय, वाई

विषय :- राष्ट्रीय चर्चासत्राच्या आयोजनासाठी परवानगी मिळण्याबाबत....

महोदय,

सन 2019-20 हे ~~वर्ष~~ अण्णा भाऊ साठे यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने, त्यांच्या साहित्याचा पुनर्विचार व्हावा या दृष्टीने आमच्या विभागाच्यावतीने दि. 30/12/2019 रोजी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले जाणार आहे. "अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यक्षेत्रातील योगदान" हा चर्चासत्राचा विषय असून, यासाठी मान्यवर व अभ्यासक उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. तेव्हा या चर्चासत्रासाठी आपली परवानगी असावी, ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

■ Shri. Prataprao Bhosale - President & Trustee
Janata Shikshan Sanstha, Wai
■ Shri. Shankarrao Gadhave - Vice President & Trustee
Janata Shikshan Sanstha, Wai

Janata Shikshan Sanstha's
**KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI, (Dist. Satara) Maharashtra Pin: 412803**
Affiliated to Shivaji University, Kolhapur, S. U. Affl. T-2-28741
NAAC Accredited Status: 'B' with CGPA 2.66
जनता शिक्षण संस्थेचे,
**किसन वीर महाविद्यालय, वाई, (जि. सातारा) महाराष्ट्र पिन : ४१२८०३**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर शि. वि. सं. टी – २–२८७४१ संलग्नीत
नॅक अधिस्विकृती : ''बी'' सीजीपीए २.६६
Website : http://www.kvmwai.org E-mail: prin.kvmwai@rediffmail.com oskvmwai@rediffmail.com

Principal
Dr. C. G. Yeole
M.Sc. Ph.D.,
Ph. (Off/Fax) 02167-220130
Principal : 02167-221972

प्राचार्य
डॉ. सी. जी. येवले
एम.एससी. पीएच.डी.
दूरध्वनी : (कार्या./फॅक्स) ०२१६७–२२०१३०
प्राचार्य – ०२१६७–२२१९७२



Kisan Mahadeo Veer
Founder President
Janata Shikshan Sanstha, Wai

Ref. :
संदर्भ : 86/1344

Date :
दिनांक : 23-12-19

प्रति,
मा. कुलगुरु
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :– राष्ट्रीय चर्चासत्राबाबत...

महोदय,

किसन वीर महाविद्यालय वाई, मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान' या विषयावर आमच्या महाविद्यालयात एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र सोमवार दिनांक ३० डिसेंबर २०१९ रोजी आयोजित केलेले आहे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे चतुरस्त्र साहित्यिक होते. पोवाडे, लावण्या, गण, वगनाटये, छक्कड, किसान गीते, मजूर गीते, कथा,कादंबरी, प्रवासवर्णन इ. प्रकारांमध्ये त्यांनी लेखन केले आहे. आपल्या साहित्य आणि शाहिरीच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे काम केले आहे. सन २०१९–२० हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने त्यांच्या साहित्याचा पुनर्विचार व्हावा, या उद्देशाने या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान आपल्या संस्थेचे अध्यक्ष मा. प्रतापराव भोसले व समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान आपल्या संस्थेचे उपाध्यक्ष मा. शंकरराव गाढवे हे भूषविणार आहेत. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

कळावे,

J.S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA WAI Dist. Satara

आपला विश्वासू,
P/C
प्राचार्य

सोबत :– राष्ट्रीय चर्चासत्राची कार्यक्रमपत्रिका.




बीजभाषक डॉ. आनंद पाटील यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष, मा. प्रतापरावजी भोसले व इतर